स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

आंतरविद्या शाखे अंतर्गत समाजकार्य विषयातील विद्यावाचस्पती
(पीएच.डी) पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

-:- संशोधन विषय -:-

“अस्थिव्यंग महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन”
विशेष संदर्भ : अकोला जिल्हा (महाराष्ट्र)

-:- संशोधक -:-

प्रा. नवनाथ बंकट बडे

(सहा. प्राध्यापक)

श्रीमती पी.डी. पाटील समाजकार्य

महाविद्यालय, खडकी बु. अकोला

-:- मार्गदर्शक -:-

डॉ. एम. ए. मांजरमकर

(सहा. प्राध्यापक)

जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय,

सिडको, नवीन नांदेड

डिसेंबर २०१९

अस्थिव्यंग महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन
विशेष संदर्भ : अकोला जिल्हा (महाराष्ट्र)

प्रस्तावना :-

संयुक्त राष्ट्र संघाने १९८१ हे वर्ष जागतिक अपंग वर्ष म्हणून जाहिर केलेले आहे. त्यानंतर राष्ट्रीय, राज्यस्तरावर अपंगाच्या विविध प्रश्नासाठी चर्चासत्रे, कार्यशाळा, पथनाट्य व इतर प्रसिध्दी माध्यमातून अपंगाचे अनेक प्रश्न प्रकाश झोतात आले.

अपंगत्व हे मानवनिर्मिती पासूनच अस्तित्वात असले तरीही अपंगाना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याची प्रक्रिया ही १९६० च्या दशकात सुरु झाली. घटनेच्या ४२ व्या कलमानुसार दुर्बल घटकांकडे विशेष लक्ष पुरविण्याचे अधिकार शासनाला दिलेले आहेत. अपंग व्यक्तीसुध्दा दुर्बल घटकात मोडतात. या जाणिवेने केंद्र शासनाने, अपंग व्यक्ती समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम १९९५ अस्तित्वात आणला आहे. शिक्षण हा प्रत्येक नागरिकांचा मुलभूत हक्क असून त्या अनुषंगाने अपंग व्यक्तींना शिक्षणाद्धारे विकसित करण्यासाठी, अपंग व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहु नयेत म्हणून सर्व अपंगांना शिक्षणात सामावून घेणे गरजेचे आहे.

२०११ च्या जनगननेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या - ११.२३ कोटी असून त्यातील पुरुषांची लोकसंख्या - ५.८३ कोटी तर महिलांची लोकसंख्या - ५.४० कोटी आहे. दिव्यांग व्यक्तींची एकूण लोकसंख्या २९.६३ लाख एवढी आहे. तर दिव्यांग महिलांची लोकसंख्या १२.७१ लाख एवढी आहे. वरील दिव्यांगांच्या लोकसंख्येमध्ये अंध, मुके, बहिरे, अस्थिव्यंग, मतिमंद, मानसिक आजार, बहु विकलांग आणि इतर दिव्यांग व्यक्तींचा समावेश करण्यात आलेला आहे. दिव्यांग व्यक्तींच्या लोकसंख्येमध्ये महाराष्ट्रात अस्थिव्यंग दिव्यांगांची १८.५१ टक्के लोकसंख्या आहे. तर अस्थिव्यंग महिलांची लोकसंख्या १.९१ लाख एवढी आहे. उपरोक्त दिव्यांग महिलांच्या लोकसंख्येचा विचार करुनच संशोधकाने संशोधन विषयाची निवड केली आहे.

शारिरीक किंवा मानसिक बिघाडामुळे सर्वसाधारण व्यक्तींप्रमाणे आपली दैनंदिन कामे करणे ज्यांना दुष्कर किंवा अशक्यप्राय झाले आहे. अशा व्यक्तींना दिव्यांग म्हणतात.

दिव्यांगामध्ये आंधळे, मुके-बहिरे आणि हातापायाने लुळे असलेले किंवा हातपायच नसलेले पांगळे-धोटे आणि मनाने दुर्बल असणा-या व्यक्तींचा समावेश होतो. हृदय, फुफ्फुस, डोळे इ. महत्वांच्या व्याधीमुळे अकार्यक्षम झालेले स्त्री-पुरुष यांचा दिव्यांग या घटकामध्ये समावेश होतो.

दिव्यांग तसा समाजात दुर्लक्षित घटक या घटकांमध्ये शारिरीक कमतरता असल्याने शारिरीक, मानसिक विकास सर्वसामान्यप्रमाणे होत नाही. शरीराच्या कोणत्या ना कोणत्या तरी अवयवात कमतरता निर्माण झाल्याने दिव्यांग व्यक्ती सर्वसामान्यापासून दूर फेकला जातो.

सर्वसामान्याप्रमाणे धावणे, खेळणे, पाहणे, बोलणे, ऐकणे व जीवन उपयोगी साधनांची हाताळणी करणे या क्रिया इतरांप्रमाणे प्रभावीपणे करता येत नाहीत. त्यामुळे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, वैवाहिक, आर्थिक व इतर पातळीवर तो मागे पडला आहे. त्यामुळे तो विकासापासून कित्येक मैल दुर आहे.

दिव्यांगत्वांची विभागणी प्रमुख दोन प्रकारात केली आहे. शारिरीक दिव्यांगत्व आणि बौध्दीक / मानसिक दिव्यांगत्व होय. अंध, बहिरे, मुके, लुळे, पांगळे यांचा समावेश शारिरीक दिव्यांगत्वामध्ये केला जातो. तर मतीमंद, मानसिक आजार, मेंदु पक्षाघात, बौध्दीक अक्षमता यांचा समावेश बौध्दीक व मानसिक दिव्यांगत्वामध्ये केला जातो. १९९५ च्या कायद्यानुसार दिव्यांगत्वाचे अंधदृष्टी, श्रवणदोष, चलनवलन दोष, मतिमंदत्व, कुष्ठरोगी मुक्त, मनोविकास अशा सात दिव्यांगत्वांचा समावेश करण्यात आलेला होता. परंतु २०१६ च्या कायद्यानुसार दिव्यांगत्वाचे एकूण २१ प्रकार सांगितले आहे. अंधत्व, कर्णबधीर, वाचा दोष, अस्थिव्यंग, मानसिक आजार, अध्ययन अक्षम, मेंदु पक्षाघात, स्वमग्न, बहुविकलांग, कुष्ठरोग बरी झालेली व्यक्ती, बुटकेपणा, बौध्दीक अक्षमता, मांशपेशीय क्षरण, मज्जासंस्थेचे तीव्र आजार, मल्टीपल स्क्लेरोसिस, थॅलेसिमिया, अधिक रक्तस्त्राव, सिकलसेल, ॲसिड अटॅक, कंपवात रोग, मतिमंद इत्यादी दिव्यांगाचे प्रकार आहेत.

शारिरीक दिव्यांगत्वाची कारणे :-

मज्जातंतुच्या आजारामुळे निर्माण झालेले दिव्यांगत्व, पाठीच्या कण्याच्या आजारामुळे आलेले दिव्यांगत्व, अर्धांगवायुमुळे आलेले दिव्यांगत्व, काहींना जन्मतःच वाकडे पाय, फाटके ओठ, तुटका कान, काही अवयव चिकटलेले राहणे असेही दोष दिसून येतात. काही वेळेस अशा व्यंगामुळे न्युनगंड निर्माण होणे व यातून आक्रमकपणा, मानसिक विकृती येण्याची शक्यताही असते. अपघातामुळे व्यक्तीला अपंगत्व येते. कामे नेहमीप्रमाणे करता येत नाहीत. कुबड्या व कृत्रीम अवयव या साधनांचा वापर केल्यामुळे मानसिक खच्चीकरणही होते.

दिव्यांगत्व येण्याचे कारणे :-

१) जन्माअगोदर :-

मुलीचे कमी वयात विवाह होणे. आईचे शरीर कुपोषित असणे, जवळ्या नात्यात लग्न करणे, रक्तगटाची समस्या, गर्भावस्थेत चुकीचे औषधे घेणे अथवा डॉक्टर च्या सल्ल्याशिवाय वापर करणे, कुपोषण होणे, गर्भपाताचा अयशस्वी प्रयत्न करणे, गर्भावस्थेत असतांना जीवनसत्व युक्त आहार न घेणे. गर्भावस्थेत असतांना आईला कावीळ, कांजण्या, गोवर होणे, ड्रग्ज, तंबाखु, मद्यपान करणे, धुम्रपान करणे, क्ष-किरणाची तपासणी करणे, इत्यादी कधी कधी अनुवंशिक कारणे असू शकतात.

२) जन्मावेळी :-

कमी दिवसात व अशक्त बाळ जन्माला येणे, जन्मावेळी ऑक्सीजन पुरवठा अपुरा होणे,

जन्मावेळी उशिरा रडणे किंवा न रडणे, १२०० ग्रॅम पेक्षा कमी वजन असणे, जन्मावेळी अपघात होणे, तज्ञ डॉक्टरच्या सल्ल्याने प्रसूती न होणे, प्रसूतीला खूप वेळ लागणे, बाळाला इजा होणे अथवा व्हायरस ची बाधा होणे, कावीळ होणे, ताप येणे इत्यादी.

३) जन्मानंतर :-

जन्मानंतर अपघात होणे, कानात टोकदार वस्तु घालणे, डोळ्याला इजा होणे, खूप ताप येणे अथवा ताप मेंदूत गेली तर योग्य औषधोपचार न घेणे, जन्मानंतर कावीळ, ध्वनि प्रदूषण, वायु प्रदूषण, दूषित अन्नपदार्थ खाणे, कुपोषित होणे, रक्तदाब, मधुमेह, वंधत्व, कॅन्सर, ट्युमर, संसर्गजन्य आजार, साथीच्या रोगावर योग्य वेळी उपचार न करणे, ॲक्सीडेंट होणे.

दिव्यांग स्त्री :-

दिव्यांग मुलगी जन्माला येणे आपल्या समाजात कमीपणाचे लक्षण मानले जाते. मुलांप्रमाणे मुलींचा सन्मान केला जात नाही. त्यातही एखादी दिव्यांग मुलगी जन्माला आली तर तिला गेल्या जन्मीचे पापे मानले जाते. अशा मुलींचा सांभाळ करणे खूप जिकिरीचे काम असते. आई-वडील असतील तर ते मोठ्या हिंमतीने त्या मुलीचे पालन पोषण करतात. सर्व प्रकारचे उपचार करतात. त्या मुलीतले व्यंग दूर करण्यासाठी प्रयत्न करतात. परंतु कायमस्वरुपी दिव्यांगत्व असेल तर ते दूर करता येत नाही. परंतु उपकरणांच्या सहाय्याने कमी करता येते. उदा. पोलिओमुळे पाय लुळा पडला असेल तर कॅलिपर, व्हीलचेअर, कुबड्या, काठी वापरुन किमान चालता येते. कर्णदोष असेल तर कानाची मशीन वापरुन कमी स्वरुपाचे आवाज मोठे करुन ऐकता येतात. मूकबधिर असेल तर त्याला हावभावांची भाषा शिकवून त्याच्या भावभावना व्यक्त करता येऊ शकतात. मतिमंद व्यक्ती कायमस्वरुपी दिव्यांग असते. त्यात फार मोठे बदल घडवून येऊ शकत नाहीत. परंतु त्या व्यक्तीची दैनंदिन कामे उदाहरणार्थ अंथरुन उचलणे, ब्रश करणे, आंघोळ करणे, जेवण व्यवस्थित करणे इत्यादी वैयक्तिक कामे त्यांना शिकवावी लागतात.

दिव्यांग स्त्री-पुरुष भेदभाव :-

पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांवर पुरुषांचे वर्चस्व आढळून येते. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेमध्ये निर्णय घेण्याची संधी, स्थान, लाभ आणि प्रतिष्ठा मिळालेली नाही. त्यात तर दिव्यांग स्त्रीला समाजात निव्वळ सहानुभूतीची, दयेची वागणूक मिळते. एखादी अस्थिव्यंग स्त्रीचे डोळे, कान व वाचेने असुदृढ असेल किंवा हातापायाने दिव्यांग असेल. तर तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन दुय्यमत्वाचा आहे. मुळातच स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन दुय्यमत्व आहे. त्यात दिव्यांग असल्याने तर वाळीत टाकले जाते. त्यामुळे दिव्यांग स्त्री आपल्या दिव्यांगत्वावर मात करुन काही नवीन करु पाहत असेल, तर तिला समाजाकडून कुचंबना असहकार, अवहेलना सहन करावी लागते. एखादा दिव्यांग पुरुष असेल तर त्याला सहकार्याची भावना दाखविली जाते. याही ठिकाणी स्त्रीला दुय्यमत्वाची वागणूक मिळते. दिव्यांग स्त्रियांकडे

समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन दुय्यम असल्याने स्त्रिया आपल्या दिव्यांगत्वामुळे घरातून बाहेर पडत नाही व त्यामुळे त्यांचा वैयक्तिक, अर्थिक आणि सामाजिक विकास होऊ शकलेला नाही. त्यामुळे त्या विकासापासून दूर असल्याचे दिसून येते.

दिव्यांग स्त्री आणि विवाह :-

एक वेळ दिव्यांग पुरुषांचे विवाह होऊ शकतो, परंतु दिव्यांग स्त्रीशी कोणताही पुरुष विवाह करण्यास तयार नसतो. अशा वेळी लग्नाचे वय झालेले असूनही कित्येक दिव्यांग मुली आयुष्यभर अविवाहितच राहतात. मुलींकडून अनेक अपेक्षा केल्या जातात. तीला जेवण बनवता आले पाहिजे, पाणी भरता आले पाहिजे. घरातील कामे करता आली पाहिजे. बालकाला जन्म देवून त्यांचे पालन पोषण व्यवस्थित करता आले पाहिजे. हे सर्व दिव्यांग मुलींना इतर मुलींप्रमाणे करता येत नाही किंवा त्यात त्या काही प्रमाणात कमी पडतात. त्यामुळे दिव्यांग मुलीसोबत कोणी विवाह करण्यास तयार नसतो. सुदृढ सर्वसामान्य मुलींमध्ये दोष शोधणारा आपला समाज ज्या मुलीमध्ये शारिरीक व्यंग आहे, अशा मुलीला कसा स्विकारेल? हा मोठा प्रश्न आहे. अशा दिव्यांग मुला-मुलींशी सुदृढ व्यक्तीने विवाह करुन दोघांचे आयुष्य सुखकर व्हावे म्हणून समाजकल्याण विभागाच्या वतीने ‘दिव्यांग-सुदृढ विवाह’ योजना राबविण्यात येते. याचा फायदा दिव्यांग पुरुषांनी सुदृढ मुलींशी लग्न करुन योजना लाटल्या. परंतु दिव्यांग मुलींशी सुदृढ व्यक्ती लग्न करावयास पुढे आले नाहीत. त्यामुळे विवाह योग्य दिव्यांग महिला अविवाहितच राहतात. कित्येकदा विवाहाचे वय उलटून गेल्यामुळे आयुष्यभर दिव्यांग महिलांना अविवाहितच रहावे लागते.

आर्थिक समस्या आणि दिव्यांग स्त्री :-

व्यक्तीची आर्थिक स्थिती वरुन त्या व्यक्तीची प्रगती अथवा अधोगती ठरु शकते. व्यक्ती श्रीमंत असेल तर तो सर्व प्रकारच्या सुखसुविधा मिळवू शकतो. परंतु गरीब व्यक्ती केवळ पैशाअभावी असलेल्या परिस्थितीत त्याला खितपत पडावे लागते. तसेच काहीसे दिव्यांग स्त्रियांच्या बाबतीत घडते. श्रीमंत दिव्यांग स्त्री महागडे उपचार करुन घेऊ शकते. उपकरणे खरेदी करु शकते. त्याच्या सहाय्याने स्वत:चा विकास करु शकते. उदा. दोन्ही पायांनी दिव्यांग असलेली स्त्री महागडी व्हीलचेअर व कार खरेदी करु शकते. या साधनांच्या सहाय्याने स्वत:चा प्रवास सुखकर करु शकते. परंतु गरीब दिव्यांग स्त्रीला या सुविधा मिळू शकत नाहीत. त्यामुळे तिला वाईट परिस्थितीत जीवन जगावे लागते. त्यामुळे तिचा शारिरीक, मानसिक व बौध्दीक विकास खुंटुन जातो. त्यामुळे समाजामध्ये प्रतिष्ठा मिळत नाही. श्रीमंत स्त्रीकडे असलेल्या संपत्तीच्या लालसेने कोणीतरी सुदृढ व्यक्ती विवाह करायला तयार होतो. परंतु गरीब दिव्यांग स्त्री हे एक ओझे मानले जाते. माणून तिच्याशी विवाह सुध्दा करायला कोणीही तयार होत नाही.

शैक्षणिक समस्या आणि दिव्यांग महिला :-

ज्या दिव्यांग महिलांचे विवाह झाले आहेत. त्यांची वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती अतिशय वाईट आहे. शाळा व महाविद्यालय यांची स्थानिक पातळीवर उपलब्धता नसल्यामुळे त्यांना शिक्षणापासून दुरच रहावे लागते. शिक्षण घेण्यासाठी घर सोडावे लागते. शारिरीक दिव्यांगत्व असल्यामुळे शाळा व महाविद्यालयामध्ये या ठिकाणी ये-जा करणे शक्य होत नाही. त्यासाठी इतरांची मदत घ्यावी लागते. दिव्यांगासाठी निवासी शासकीय व निम शासकीय शैक्षणिक संस्था फक्त १० वी पर्यंतच आहेत. त्यामुळे पुढील उच्च शिक्षण घेण्यासाठी अनेक अडचणी समोर असतात. त्या अडचणी इतरांच्या मदतीनेच दुर कराव्या लागतात. विभक्त कुटुंब पध्दतीमध्ये इतर व्यक्तींची मदत भेटणे कठीण असते. त्यामुळे दिव्यांग महिला उच्च शिक्षणापासून दुरच असल्याचे दिसून येते.

शिक्षण जेमतेम असल्यामुळे आर्थिक परिस्थिती ही साधारणच असते. आर्थिक परिस्थिती साधारण असल्यामुळे त्यांचा विवाह साधारण कुटुंबातील व्यक्तीसोबत होणार. दिव्यांग महिलांची सामाजिक स्थिती तर भयानक आहे. या महिलांना समाजामध्ये योग्य मान, सन्मान मिळत नाही. सण, खेळ, अशा ठिकाणी सहभाग नोंदवता येत नाही. त्यामुळे मानसिक त्रास होतो. पुर्वी संयुक्त कुटुंब पध्दती होती. त्यामुळे अशा व्यक्तींना मान, सन्मानाने वागविले जात होते. परंतु या धावत्या जगामध्ये विभक्त कुटुंब पध्दतीला अधिक महत्व प्राप्त झालेले. त्यामुळे आजच्या परिस्थितीत कुटुंबामध्ये दिव्यांग व्यक्तीला मान, सन्मान तर सोडाच त्यांच्या मुलभूत गरजांची सुध्दा पुर्तता होत नाही. त्यामुळे घर सोडून भिक मागण्याची वेळ त्यांच्यावर येते. सार्वजनिक ठिकाण, मंदिर, मस्जिद, बस स्थानक अशा ठिकाणी दिव्यांग व्यक्ती भिक मागत असतांना दिसून येतात.

दिव्यांग महिलांचे वैवाहिक जीवन अतिशय हलाखीचे आहे. कारण त्यांची शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती अतिशय खराब आहे. दिव्यांग महिला विवाह बंधनात अडकली जाते. तेव्हा संसाराचा गाडा चालविणे खूपच अवघड आहे. विवाह झाला की, प्रसुतीला सामोरे जावे लागणार आहे. शरीराने सुदृढ महिलेसाठी प्रसुती म्हणजे पूनर्जीवन वाटते. अशा वेळी दिव्यांग महिलांना तर अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शारिरीक व्यंग असल्यामुळे पोटामध्ये वाढत असलेल्या लहान बाळाचे ओझे घेवून चालणे, फिरणे, प्रत्येक महिन्याला दवाखान्यात जाणे, शरीर सांभाळून चालणे, उठणे, बसणे या क्रिया करणे म्हणजे तारेवारची कसरतच आहे. ते नऊ महिने नऊ दिवस तिच्यासाठी एक समस्यांच आहे. अशा वेळी बाळाला जन्म दिल्यानंतर, बाळाला आंघोळ घालणे, दुध देणे, खेळविणे, झोपी घालणे, अशी अनेक कामे करण्यासाठी तीला खुपच त्रास होतो. अशा वेळी इतर व्यक्तींची सतत गरज पडत असते. इतर व्यक्तींची गरज भेटेलच असे शक्य नाही. त्यामुळे दिव्यांग महिलांच्या समस्यांना वाचा फोडून शासन दरबारी न्याय मिळावा यासाठी केलेला एक छोटासा प्रयत्न होय.

संशोधन विषय निवडीची आवश्यकता :-

संशोधनासाठी एखादी समस्या व प्रश्न समोर ठेऊन विषयाची निवड करणे आवश्यक आहे. अस्थिव्यंग महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन या विषयावर आजपर्यंत संशोधन झालेले नाही. दिव्यांग महिलांना त्यांच्या समस्यांची जाणीव झाली पाहिजे. त्यांच्या समस्यांची मांडणी शासन दरबारी मांडता आली पाहिजे. दिव्यांग महिलांच्या समस्यांना वाचा फोडून त्यांना शासनाकडून योग्य न्याय मिळाला पाहिजे. समाजातील इतर महिलांप्रमाणे दिव्यांग महिलांना आपले जीवन सन्मानाने आणि प्रभावीपणे जगता आले पाहिजे. दिव्यांग महिलांना भावनिक आधाराची आवश्यकता नाही. तर त्यांना प्रोत्साहन, प्रेरणा आणि पाठीवरती हात ठेवून लढ म्हणण्याची आवश्यकता आहे.

उपरोक्त दिव्यांग महिलांच्या जीवनातील अनेक समस्यांचा विचार करुनच संशोधकाने विषयाची निवड केली आहे.

संशोधनाचे उद्देश :-

कोणत्याही विषयावर संशोधन करीत असतांना त्या विषयासंदर्भात विशिष्ट उद्देश असणे आवश्यक असते. **"अस्थिव्यंग महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन"** या विषयाचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

१) अस्थिव्यंग महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि वैवाहिक स्थितीचे अध्ययन करणे.

२) अस्थिव्यंग महिलांना येणाऱ्या विविध समस्यांचे अध्ययन करणे.

३) अस्थिव्यंग महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

४) अस्थिव्यंग महिलांच्या सक्षमीकरणाबाबत शासकीय यंत्रणेची भूमिका अभ्यासणे.

५) अस्थिव्यंग क्षेत्रामध्ये व्यावसायिक समाजकार्याची मध्यस्थी या विषयीचा अभ्यास करणे.

संशोधनाचे गृहीतकृत्ये :-

१) अस्थिव्यंग महिलांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि वैवाहिक स्थिती हलाखीची आहे.

२) अस्थिव्यंग महिलांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते.

३) अस्थिव्यंग महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

४) अस्थिव्यंग महिलांच्या सक्षमीकरणात शासकीय यंत्रणेची भूमिका महत्वपूर्ण आहे.

संशोधन आराखडा :-

संशोधन कार्यास प्रारंभ करण्यापुर्वी संशोधनाचा आराखडा तयार करावा लागतो. त्यात संशोधनाचा उद्देश, गृहितकृत्ये, संशोधनाचे क्षेत्र, कालावधी, संशोधनासाठी आवश्यक सामग्री गोळा करणे, ती किती व कोणत्या प्रमाणात करावी, नमुना निवडीचे आधार कोणते, माहिती मिळविण्यासाठी साधने, माहितीचे विश्लेषण, तंत्र साधनांचा उपयोग, संशोधन कार्याचा संभाव्य खर्च इत्यादी अनेक गोष्टी प्रारंभिच ठरवाव्या लागतात. भविष्यात कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागेल याचाही विचार करावा लागतो. आराखडा बनविणे म्हणजेच कार्य योजना आखणे होय.

प्रस्तुत अध्ययनात वर्णनात्मक संशोधन आराखडा या संशोधन आराखड्याचा वापर करण्यात येईल.

वर्णनात्मक संशोधन आराखडा :-

वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश उपलब्ध तथ्य, माहिती व आकडेवारीच्या आधारावर एखादी व्यक्ती, समुह, समाज, घटना किंवा कोणताही विषय अथवा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा आहे. त्यासाठी अध्ययनासाठी निवडलेल्या 'विषय वस्तुची' संपुर्ण माहिती असणे आवश्यक आहे. माहिती सत्य व वास्तविक असेल तरच वैज्ञानिक अध्ययन होईल अन्यथ अध्ययनाचे स्वरुप तत्वज्ञानिय बनेल. या संशोधन आराखड्याच्या आधारावर विश्वसनिय तत्व व वास्तविकता ही असते. या आधारावर तत्व व माहितीचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून प्राप्त नविन माहितीचे अर्थनिरुपण केले जाते. या प्रक्रियेला वर्णनात्मक विश्लेषण असे संबोधले जाते आणि ज्या आराखड्याच्या केंद्रस्थानी या प्रक्रियेला ठेवले जाते. त्याला वर्णनात्मक संशोधन आराखडा असे म्हणतात.

वर्णनात्मक संशोधन आराखड्यात वैज्ञानिक तंत्राचा उपयोग करुन तथ्य संकलित केली जातात. मुलाखत, अनुसूची, प्रश्नावली, प्रत्यक्ष निरीक्षण, सहभागी निरीक्षण, सामुदायिक दस्ताऐवज, अभिलेख इत्यादींचे विश्लेषण करण्याच्या कार्याचा प्रामुख्याने या आराखड्यात समावेश होतो.

सदर संशोधन आराखड्यात वर्णनात्मक संशोधनाचा वापर करण्यात येत आहे. कारण अध्ययनासाठी निवडलेला विषय **"अस्थिव्यंग महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन"** हा आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संख्यात्मक व गुणात्मक संशोधन पध्दतीद्वारे अकोला जिल्ह्यातील अस्थिव्यंग महिलाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यात येणार आहे.

सदरील संशोधनाचे विश्व अकोला जिल्ह्यातील अस्थिव्यंग महिला राहणार आहेत. संशोधनाचे क्षेत्र अकोला जिल्ह्यातील ७ तालुके राहणार आहेत. प्रस्तुत संशोधनातील एकक हे १८ ते ४० वयोगटातील अस्थिव्यंग महिला राहणार आहेत.

नमुना निवड :-

"समग्रातील काही प्रतिनिधीक एककाची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय." संशोधनामधुन ज्या समग्र किंवा विश्वाच्या विशिष्ठ लक्षणांच्या बाबतीत निष्कर्ष काढावयाचे आहेत, त्या समग्राच्या एका भागाच्या व खंडाच्या अध्ययनावरुन त्या समग्रातील विशिष्ठ लक्षणाबाबत काही अनुमान बांधण्याकरीता समग्रामधुन पाहणीसाठी एक भाग निवडण्याच्या पध्दतीस नमुना निवड म्हणतात.

निवड पध्दतीचे प्रकार :-

सामाजिक संशोधनात नमुना निवड पध्दती हा वैज्ञानिक अध्ययनाचा एक भागच झाला आहे. पण अध्ययन विषय व अध्ययनाचा हेतु लक्षात घेता सर्वच प्रकारच्या अध्ययनासाठी एकाच पध्दतीने नमुना निवड करणे संयुक्तिक ठरणार नाही. अध्ययन विषयाचे स्वरुप, त्याची व्याप्ती, उपलब्ध वेळ इत्यादी सर्व दृष्टीने अनुकूल ठरेल असाच नमुना निवडीचा प्रकार असला पाहिजे. अर्थात संशोधन कर्त्याला नेमक्या कोणत्या नमुना निवड पध्दतीचा उपयोग केल्या जाईल हे अगोदरच ठरविणे सोयीचे होईल. त्यासाठी नमुना निवडीच्या प्रमुख प्रकारांचा विचार करणे आवश्यक ठरेल. समग्रातील एककांना नमुन्यामध्ये निवडून येण्याची संभाव्यता आहे किंवा नाही या आधारावर नमुना निवडीचे दोन प्रकार पडतात.

१) **संभाव्यता नमुना निवड**

२) **गैरसंभाव्यता नमुना निवड**

सोयीस्कर नमुना :-

सदर संशोधनासाठी गैरसंभाव्यता नमुना निवडी अंतर्गत सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

या नमुना निवड पध्दतीमध्ये संशोधक स्वतः महत्वाचा असतो. यात तो स्वतः आपल्या सोयीनुसार नमुन्याची निवड करतो. यातील किती घटकांची निवड करायची, कोणत्या घटकांची निवड करायची हे तोच ठरवितो. यात जी तथ्ये उपलब्ध असतात. त्यानुसार तथ्य संकलनाची पध्दत वापरायची या अनुषंगाने संशोधक घटकांची निवड करीत असतो. त्यात नमुन्याची निवड ही वेळ, पैसा, एककांशी संपर्काची संधी, साधन सुची यांची उपलब्धता इत्यादी गोष्टींचा विचार करुन सोयीनुसार नमुन्याची निवड केली जाते. याचाच अर्थ एककांची निवड करतांना कोणतेही पुर्व नियोजन नसते. त्यामध्ये कोणताही शास्त्रीय विचार नसतो. संशोधकांची स्वतःची सोय हाच निकष

घटक निवडतांना लावला जातो. जेव्हा अभ्यास क्षेत्र निश्चित नसते व घटक अथवा एकक कोणते निवडावेत या बद्दल कोणतेही शास्त्रीय निकष लावता येत नाहीत. तेव्हा सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा उपयोग केला जातो.

प्रस्तुत संशोधनासाठी सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येईल. अकोला जिल्ह्यातील एकूण ०७ तालुक्यातील सोयीनुसार उत्तरदात्यांची निवड करण्यात येईल. तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, सहा. आयुक्त कार्यालय आणि अपंग वित्त व विकास महामंडळ यांच्याकडून चर्चा पध्दतीने माहिती संकलीत केली जाणार आहे.

तथ्य संकलन :-

सदरील संशोधनामध्ये तथ्य संकलनाच्या प्राथमिक व द्वितीय या दोनीही साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक साधनामध्ये निरीक्षण, मुलाखत व अनुसूची या माध्यमातून अकोला जिल्ह्यातील अस्थिव्यंग महिला संदर्भात तथ्य संकलित करण्यात येणार आहेत. तसेच द्वितीय स्वरुपाच्या साधनामध्ये शासकीय व अशासकीय कार्यालयातील अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, दैनिक वृत्तपत्रे, त्याचप्रमाणे संगणक प्रणालीद्वारे विविध संकेत स्थळांच्या माध्यमातून तथ्य संकलीत केले जाणार आहे.

तथ्य विश्लेषण व निर्वचन :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संकलीत तथ्यांचे संख्यात्मक व गुणात्मक पध्दतीने विश्लेषण करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने केंद्रिय प्रवृत्तीची मापके, सरासरी, टक्केवारी, सहसंबंध या तंत्राचा तसेच (SPSS) एस.पी.एस.एस. या डेटा विश्लेषण तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन कालावधी :-

सदरील संशोधन २०१९-२० ते २०२०-२१ या कालावधीत तथ्य संकलीत करुन आकडेवारीचे अध्ययन करण्यात येणार आहे. त्यासाठी संशोधन कालावधी ऑक्टोबर २०१९ ते ऑक्टोबर २०२२ या दरम्यान असणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

अस्थिव्यंग महिलांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे अध्ययना संदर्भात करण्यात येणाऱ्या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा खालील प्रमाणे राहिल.

सदरील संशोधनाची भौगोलिक व्याप्ती व मर्यादा ही अकोला जिल्ह्यापुर्ती मर्यादित राहील.

सदरील संशोधनामध्ये तथ्य संकलनातील माहितीची विश्वसनियता ही उत्तरदात्याने दिलेल्या माहितीवर अवलंबून असेल.

संशोधन प्रकरणांची रुपरेषा :-

अकोला जिल्ह्यातील अस्थिव्यंग महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन केल्यानंतर संशोधन प्रबंधात सु-सुत्रता येणाच्या उद्देशाने खालील प्रकरणांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले	:	प्रस्तावना
प्रकरण दुसरे	:	संशोधन साहित्याचा आढावा
प्रकरण तिसरे	:	संशोधन पध्दती
प्रकरण चौथे	:	तथ्य संकलन व विश्लेषण
प्रकरण पाचवे	:	निष्कर्ष व शिफारशी

संदर्भग्रंथ सुची :

१) प्रा. डॉ. गजानन गुल्हाने / किरण धांडे, अध्ययन अक्षमता, नभ प्रकाशन, अमरावती-२०१२

२) डॉ. डी. आर. सचदेव, भारतातील समाजकल्याण व समाजकल्याण प्रशासन, के सागर पब्लिकेशन-२००९

३) डॉ. नीलम ताटके, समाजकार्यकोश, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-२००८

४) प्रा. भगवान काळे, अपंगत्व दशा आणि दिशा, संकेत प्रकाशन, जालना-२००८

५) भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श, ISSN २३१९-८६४८, सुर्या पब्लिकेशन, लातुर-२०१९

६) रा. ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर

७) प्रा. एस. एस. देशपांडे, मानवी हक्क, चेतक बुक्स, पुणे-२०१५

८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३, चर्च रोड, पुणे.

९) https://maharashtratimes.indiatimes.com

संशोधक
प्रा. नवनाथ बंकट बडे
(सहा. प्राध्यापक)
श्रीमती पी.डी. पाटील समाजकार्य
महाविद्यालय, खडकी बु. अकोला

मार्गदर्शक
डॉ. एम. ए. मांजरमकर
(सहा. प्राध्यापक)
जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय,
सिडको, नवीन नांदेड